महानेट प्रकल्पासाठी मार्गचा हक्क (ROW) एक खिडकी (single Window) योजनेमार्फ़त मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.GAD-मातंसं०८२/३/२०१८-DIR-DIT (MH)
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक: १७/०२/२०१८

वाचा: शासन निर्णय डीआयटी/फ़ाईल-०३/३३६ दि. ०१/०४/२००६

प्रस्तावना:-

महाराष्ट्रातील जवळपास १३००० ग्रामपंचायतींना उच्च क्षमतेची इंटरनेट जोडणी महानेट (भारत नेट-दुसरा टप्पा) प्रकल्पामार्फ़त उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर प्रकल्प राज्य शासनाच्या १०० % मालकीची कंपनी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (महाआयटी) मार्फत राबविण्यात येत आहे. महाआयटी स्पेशल पर्पज व्हेकल (एसपीव्ही) आणि प्रकल्प राबविणारी संस्था (एसआयए) म्हणून कार्यरत राहील. महाआयटी निविदा प्रक्रिया राबवून प्रकल्पाची अंमलबजावणी करेल. सदर प्रकल्पाकरीता फायबर केबल (सुमारे ७० % ग्रामपंचायतींसाठी) आणि उर्वरित ग्राम पंचायतींसाठी विद्युत संचयन आणि वितरण नेटवर्कचा वापर करुन हवाई मार्गांचा वापर केला जाईल. भारत सरकारने सप्टेंबर २०१७ मध्ये महानेट प्रकल्पाला ५०,३१३ किमी ऑप्टिक फायबर केबलसाठी मंजुरी दिली आहे. महाआयटीने दि. ९ डिसेंबर २०१७ रोजी भारत सरकारसह एक सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. भारत सरकारने दिलेल्या निर्देशानुसार, मार्च २०१९ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करावा लागणार आहे. ३१ जानेवारी, २०१८ रोजी महाआयटी मार्फ़त सिस्टिम इंटिग्रेटरच्या निवडण्याकरीता निविदा प्रसिध्द केली आहे. महानेट प्रकल्प वेळेत पुर्ण करण्याकरीता सिंगल विंडो मार्फ़त मार्गचा हक्क (ROW) मान्यताबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय: -

a) महानेट ही “महत्त्वपूर्ण सार्वजनिक हेतू योजना" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

b) महानेट प्रकल्पासाठी, राज्यातील मार्गाच्या हक्कासाठी (भूमिगत आणि हवाई) परवानगी घेण्यापासुन सूट देण्यात येत आहे. महानेट प्रकल्पासाठी फक्त रस्ते खोदण्याच्या/केबल टाकण्याच्या पांच दिवसापूर्व सूचना संबधित संस्थांना देण्यात यावी. सदर निर्णय राज्य शासनाच्या अखत्यारीखालील असलेल्या सर्व विभाग (वन क्षेत्र वगळता जेथे कायद्याच्या विविध तरतुदींनुसार पूर्व परवानगी आवश्यक आहे), राज्यातील शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्य सरकारच्या सर्व सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि राज्य सरकारच्या कायद्याव्दारे स्थापन केलेल्या सर्व संस्थांच्या कार्यक्षेत्रासाठी लागू राहील.

c) भारतनेट प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी दूरसंचार विभाग, महाराष्ट्र शासन आणि बीबीएनएल यांच्यात झालेल्या सामंजस्य कराराच्या (एमओयू) नुसार राज्य सरकारव्दारे मार्गाचा ह्क्क देण्यासाठी शुल्क आकारले गेले नाही. भारतनेट प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याप्रमाणे, महानेट जो भारतनेट प्रकल्पाचा दुसरा टप्पा आहे, करीता समान द्दष्टिकोनाचा अवलंब करुन महानेट प्रकल्पासाठी मार्गाचा ह्क्क (आरओडब्ल्यू) शुल्क, प्रशासकीय आणि अन्य प्रकारच्या शुल्कापासून सूट देण्यात येत आहे. हे राज्य सरकारच्या विभागांच्या अधिकारक्षेत्रांतर्गत (वन क्षेत्र वगळता जेथे कायद्याच्या विविध तरतुदींनुसार पूर्व मान्यता आवश्यक आहे), राज्यातील शहरी व ग्रामीण स्थानिक संस्था आणि राज्य सरकारच्या सर्व सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि राज्य सरकारच्या कायद्याव्दारे स्थापन केलेल्या सर्व संस्थाना लागू राहील.

d) महानेट प्रकल्पाला राज्य शासनाकडुन लागणारा निधी उपलब्ध करुन देण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

e) महानेट किंवा त्यांच्या संस्था, टेन्चींग़ं आणि ओएफसी घातल्यानंतर पुनर्स्थापना पूर्ण झाल्याचे सुनिश्चित करतील. महाआयटी किंवा त्यांच्या संस्थाकडे पुनर्स्थापनेची कामे करण्याचा पर्याय असेल. संस्था पुनर्स्थापनेची कामे स्वत: करतील किंवा रक्कम (पीडब्ल्यूडीच्या दरानुसार किंवा निविदा प्रक्रियेदरम्यान निश्चित दरांनुसार जे कमी असेल त्यानुसार) संबंधित संस्थाकडे जमा करतील जे पुनर्स्थापनेची कामे करतील.

f) हवाई (Aerial) मार्गासाठी, एमएसडीसीएल, शहरी स्थानिक सस्थां आणि ग्रामपंचायती इत्यादींमधील इलेक्ट्रिक खांब व संबंधित सुविधां पर्यंत प्रवेश व त्याचा वापर करण्याकरीता महाआयटी/ अधिकृत संस्थेला परवानगी देण्यात येत आहे. तसेच त्याकरीता लागणारा शुल्क माफ़ करण्यात येत आहे. पुढील कोण्तीही परवानगी संबंधित संस्थाकडुन घेण्याची आवश्यकता राहाणार नाही.

g) ग्राम पंचायत, तहसील कार्यालये आणि इतर कार्यालय / ठिकाणी जिथे पॉईंट ऑफ प्रेझन्स (पीओपी) सेट अप करण्याकरीता नेटवर्क टर्मिनेशन डिव्हाइसेस आणि इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे स्थापित करण्यात येईल. तसेच महानेट प्रकल्पाकरीता महाआयटी मार्फ़त अधिकृत व्यक्तींना सयंत्र हाताळण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

h) महाआयटीने निश्चित केलेल्या पीओपी स्थानांसाठी ग्रामपंचायत व तहसील कार्यालयाने महानेट प्रकल्पाकरीता संबंधित कार्यालय / इमारत परिसरात त्यांच्या मालकीची जागा मोफत देण्यात येईल (तहसील कार्यालयांमध्ये सुमारे ४०० चौरस फूट आणि २०० ग्राम पंचायत कार्यालयामध्ये सुमारे २०० चौ.फुट). महाआयटीला याकरीता वेगळी परवानग़ी घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

i) महानेट प्रकल्पासाठी ग्रामपंचायत, तहसील कार्यालये आणि इतर पीओपीच्या ठिकाणी वेगळ्या मिटर शिवाय वीज जोडणी देण्यात येईल. प्रकल्प स्थापित झाल्यानंतर महानेट प्रकल्पाच्या मालमत्तेसाठी महाआयटीमार्फ़त स्वतंत्र विद्युत कनेक्शन उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न राहील. याकरीता लागणा-या सर्व आवश्यक परवानग्या आणि ना-हरकत प्रमाणपत्रांतुन सूट देण्यात येत आहे.

j) नवी मुंबई येथे किमान २५०० चौरस फूट क्षेत्र असलेल्या स्टेट नेटवर्क ऑपरेटिंग सेंटर (एनओसी) व औरंगाबाद / नागपूर येथे किमान १२०० चौरस फूट क्षेत्रफळ असलेल्या आपदा रिकवरी स्टेट नेटवर्क ऑपरेटिंग सेंटर स्थापन करण्यात येईल (शक्यतो विभागीय आयुक्त कार्यालय परिसरात).

k) सदर शासन निर्णयाचे तंतोतंत पालन करण्याकरीता प्रशासकीय विभागांनी परिपत्रकाव्दारे क्षेत्रीय कार्यालयांना सूचना निर्गमित करावे व प्रकल्प यशस्वीपणे राबविण्याकरीता सहकार्य करावे.

मंत्रिमंडळाच्या दि. ३०.०१.२०१८ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१७२०१६५२८७११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांनकत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

S V R Srinivas

Digitally signed by S V R Srinivas
DN: c=IN, postalCode=400020, st=Maharashtra, 2.5.4.20=31d35fda97cba0c6a6c5e2ca7125fd8ba7f7201a47f0e71dbf230047862bd061, serialNumber=914d8a9c1092ca4b44280033c71560ea75b2d56dcb4d3fc1f81eb6dfc5fcbe63, cn=S V R Srinivas
Date: 2018.02.21 13:13:47 +05'30'

(एस.व्हि.आर. श्रीनिवास)
प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व विधानमंडळ सदस्य, विधान भवन, मुंबई
४. सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे स्वीय सहायक
५. सर्व अमुस/प्रस/सचिव मंत्रालय, मुंबई
६. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक

७. व्यवस्थापकीय संचालक महाआयटी
८. व्यवस्थापकीय संचालक महावितरण
९. व्यवस्थापकीय संचालक महाजेनको
१०.सर्व विभागीय आयुक्त
११.सर्व जिल्हाधिकारी
१२.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३.सर्व महापालिका आयुक्त
१४.सर्व मुख्यधिकारी, नगर परिषद
१५.महालेखापाल-१ (लेखा व परीक्षा),महाराष्ट्र,मुंबई
१६.महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र,मुंबई
१७.महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र,नागपूर
१८. महालेखापाल-२ (लेखा व परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
१९. निवड नस्ती, माहिती तंत्रज्ञान